Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महिलांची भूमिका आणि आव्हाने

**उद्धव गोविंदराव घाटे**
Mo.9637813683
ghateuddhav9552@gmail.com

**प्रस्तावना :**

ग्रामीण अर्थव्यवस्था ही भारताच्या आर्थिक विकासाचा कणा मानली जाते, आणि या अर्थव्यवस्थेत महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. महिलांचा सहभाग शेती, पशुपालन, हस्तकला, आणि कुटीरउद्योग यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये दिसून येतो. ग्रामीण भारतातही महिला रोज नवनवीन टप्पे गाठत आहेत. सामाजिक आणि कौटुंबिक बहिष्कार असूनही, स्त्रियांनी त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा हक्क सांगितला आहे, सुरवातीपासून व्यवसाय उभारले आहेत आणि त्यांच्या आसपासच्या लोकांना प्रेरणा दिली आहे. पंचायत व्यवस्थेत महिलांना ५०% आरक्षण दिले जाते, तर 'राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान' सारखे अनेक राष्ट्रीय कार्यक्रम त्यांना तळागाळात नेतृत्वाच्या संधी उपलब्ध करून देत आहेत. 'स्वच्छ भारत मिशन' आणि 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा' यांसारख्या सरकारी उपक्रमांमुळे महिला कामगारांना पर्यवेक्षी नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

तथापि, साथीच्या रोगाने उभ्या केलेल्या आव्हानांचा परिणाम म्हणून, भारतीय महिलांसाठी कमी होत असलेल्या आर्थिक संधींमुळे भारतातील लैंगिक अंतर 4.3% ने वाढले आहे, ज्यामुळे औपचारिक कर्मचाऱ्यातील त्यांच्या सहभागात घट झाली आहे. साथीच्या संकटाचे आफ्टरशॉक अनौपचारिक कामगार बाजारातही जाणवत आहेत. बिनपगारी कामांची भरमसाठ स्त्रीचा वेळ आणि त्याद्वारे, निवड करण्याची तिची क्षमता मर्यादित करते. हे त्यांना उच्च शिक्षण आणि कौशल्य विकासापासून मागे ठेवते, त्यांच्या उद्योजकीय वाढीस प्रतिबंध करते.

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असणाऱ्या महिला त्यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावताना आज दिसत आहेत. ग्रामीण महिला या दारिद्र्यरेषेखाली आणि अत्यंत गरिबीच्या परिस्थितीत जीवन जगत असतात. ग्रामीण महिलांच्या एकत्रीकरणासाठी आणि सेवा एकत्रित करण्यासाठी त्यांच्या क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या आधारभूत उपायांसह अनेक आर्थिक आणि सामाजिक पर्यायाची गुंतवणूक करून त्यांच्यासाठी पावले उचलली जात आहेत. स्त्रिया व्यापार आणि उत्पादनासाठी पद पुरवठ्यात प्रवेश करण्यासाठी अस्तित्वात असलेला सूक्ष्मपतयंत्रणा आणि बचत गटासारख्या सूक्ष्म वित्त संस्थांची नवीन स्थापना आणि बळकटीकरण करत आहेत. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा दुरुस्त होण्यास मदत होत आहे. उत्पादक आणि कामगार म्हणून सामाजिक आर्थिक विकासासाठी महिलांचे योगदान औपचारिक आणि अनुपौपचारिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात दिसत आहे. कोणत्याही देशातील समुदायाचा आर्थिक विकास सुनिश्चित करण्यासाठी महिला सशक्तिकरण आवश्यक आहे. आणि त्यांच्या भूमिकांचा अभ्यास करणे हा संशोधनाचा विषय आहे

त्यांच्या योगदानामुळे केवळ कौटुंबिक अर्थव्यवस्था नव्हे तर ग्रामीण समाजाचा विकासही साध्य होतो. शेती व्यवस्थापक ते भूमिहीन शेतमजूर अशी परिस्थितीनुसार महिलांची जबाबदारी बदलताना दिसते. पिक व्यवस्थापन, पशुधन विकास फलोत्पादन, काढणी पश्चात प्रक्रिया, शेती व जंगल संवर्धन, शेतीपूरक उद्योग तसेच ग्रामविकासामध्ये

महिला अतिशय जबाबदारीने काम करतात. प्रशिक्षण नवीन तंत्राची माहिती आणि त्यांच्या श्रमाचे मूल्य दिल्यास शेती तसेच, ग्रामविकासाचा चेहरा मोहरा महिला बदलू शकतात. वातावरण बदल नैसर्गिक साधन संपत्तीचा दुरुपयोग आणि ऱ्हास ही सद्यस्थितीतील भारतीय शेती पुढील आव्हाने आहेत. या आव्हानात्मक शेती व्यवस्थेचा कणा म्हणजे शेतकरी महिला आहेत. तरीदेखील शेती व्यवस्थापनामध्ये व्यस्त असलेल्या महिलांना आजही यामध्ये महत्त्वाचे स्थान नाही. देशाच्या विविध हवामानाच्या पट्ट्यांपैकी बेट प्रदेशापासून ते पश्चिमी हिमालय प्रदेशापर्यंत 14.8 ते 70.71% महिला या शेतकरी, शेतमजूर आणि कृषी कामगार म्हणून कार्यरत आहेत.

महिलांनीच प्रथम घरगुती स्तरावर पीक लागवडी सुरुवात केली आणि तेथूनच पुढे शेती विज्ञानाचा म्हणजेच कृषीचा शोध लागला. जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या मूलभूत गरजा जतन करण्याची जी काळजी महिला घेतात त्या आयुष्यभर त्या कामात निपुण असतात. शेतीपूरक विकासामध्ये पीक उत्पादन आणि व्यवस्थापन पशुधन विकास, फलोत्पादन, काढणीपश्चात प्रक्रिया, शेती आणि जंगल संवर्धन, मत्स्यपालन अशी अगणित महत्त्वाची कार्य महिला अतिशय जबाबदारीने करतात. अनेक शोध प्रबंधांमध्ये दिलेल्या आकड्यापेक्षाही शेती विकासामध्ये महिलांचे जास्त कार्य आहे. महिलांचे काम हे व्यवस्थापक ते भूमिहीन शेतमजूर असे परिस्थितीनुसार बदलताना दिसून येते.

## महिलांची भूमिका

### 1.शेती व शेतीपूरक व्यवसाय :

महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर असतो, जसे की पेरणी, कापणी, तण काढणे, आणि पीक प्रक्रिया, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, व मधुमक्षिका पालन यांसारख्या क्षेत्रांमध्ये त्यांचे महत्त्वाचे योगदान असते. महिलांच्या कामाच्या सरासरी मध्ये जर आपण पाहिले तर जमिनीच्या मशागतीमध्ये 32% महिलांचा सहभाग असतो, पेरणी आणि परिसर स्वच्छता ८० टक्के, आंतरमशागत 86%, कापणी वाळवणे स्वच्छता आणि साठवण 84% इतक्या मोठ्या प्रमाणात महिलांचा शेतीच्या कामांमध्ये सहभाग असतो हे आयआयपीएस यांच्या अहलावलावरून लक्षात येते. एकूणच महिलांची गरज लक्षात घेऊन हे संशोधन करत असताना पारंपरिक शेती पद्धतीमध्ये महिलांना होणारा शारीरिक त्रास, लागणारा आवाज तर वेळ लक्षात घेऊन कृषी संशोधन संस्था आणि कृषी विद्यापीठांनी महिलांचे श्रम कमी होण्यासाठी कापूस वेचताना वापरावयाचा कोट, सोयाबीन कापणी मोजे, दूध काढताना वापरावयाची स्टूल, उभ्याने वापरावयाचे कोळपे, सायकल कोळपे, धान्याच्या चाळण्या, शेंगा फोडणी यंत्र, रोप लागवड यंत्र अशी अनेक छोटी यंत्रे अवजारे विकसित केली आहेत. यामुळे त्यांचे शेतीमधील काम करताना होणारे शारीरिक कष्ट कमी झाले, वेळेची बचत झाली. प्रयोगशील महिला शेतकरी आता ट्रॅक्टर देखील चालू लागल्या आहेत.

एकूणच शेतीच्या उत्पादनामध्ये महिलांचा सरासरी सहभाग हा 55 ते 66 टक्के मजूर असा आहे. काही भागांमध्ये याचे प्रमाण जास्त आहे. एका अभ्यासानुसार हिमालयीन विभागामध्ये एक बैल जोडी एका हेक्टर मध्ये प्रतिवर्ष 1064 तास, पुरुष 1212 तास आणि महिला 3485 तास काम करताना दिसून येतात.

**2. हस्तकला व कुटीरउद्योग**

ग्रामीण भागातील अनेक महिला हातमाग, भरतकाम, मातीची भांडी तयार करणे, आणि बास्केट विणणे यांसारख्या व्यवसायांमध्ये कार्यरत असतात. हे व्यवसाय स्थानिक बाजारपेठेत आणि पर्यटन क्षेत्रात मोठे योगदान देतात. हस्तकला आणि कुटीर उद्योग यामध्ये ग्रामीण महिला अग्रेसर आहेत. कुटीर उद्योग असा उद्योग आहे जो पूर्ण परिवाराच्या मदतीने पूर्ण कालिक व्यवसाय याच्या रूपात महिला सशक्ति करण्यासाठी महत्त्वाचा मानला जातो असे ओमप्रकाश लाल श्रीवास्तव यांनी म्हटले आहे. ग्रामीण कुटीर उद्योगाचा जर आपण विचार केला तर हा उद्योग पूर्णतः ग्रामीण भागात स्थापित केला जातो. ग्रामीण कुटीर उद्योग हा दोन सदस्यांमध्ये स्थापन केला जातो. यात कोंबडी पालन, पशुपालन, विविध टोकऱ्या बनवणे, रेशीम उत्पादन, मधुमक्षिका पालन, आणि मासेमारी हा व्यवसाय चालतो. आज ग्रामीण भागात कुटुंबाच्या दैनंदिन गरजा भागवण्याची काम शेळ्या कोंबड्यांच्या विक्रीतून होते. परंतु हा व्यवसाय शास्त्रोक्त पद्धतीने केल्यास त्यापासून जास्त फायदा मिळू शकतो. स्थानिक कोंबड्या शेळ्यांच्या प्रतीमध्ये सुधारणा करून त्यांचे पालन पोषण केल्यास महिलांना यापासून चांगले उत्पन्न मिळू शकते. आज या सर्व गरजांचा विचार करून ग्रामीण भागातील महिला अनेक व्यवसाय सुरू करत आहेत. यामध्ये वेशभूषा, केशभूषा, फॅशन डिझायनिंग, ड्रेस डिझाईनिंग,ब्युटी पार्लर, बेकरी, ग्रामीण हस्तकला, स्वेटर तयार करणे यासारखे अनेक व्यवसाय ग्रामीण युवती सुरू करू पाहत आहेत. यातून देखील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा भक्कम होण्यास मदत होत आहे.

**स्वयं-सहायता गट (SHG)**

महिलांच्या नेतृत्वाखालील स्वयं-सहायता गट (SHG) बचत व पतपुरवठा यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. हे गट महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळवून देण्याबरोबरच त्यांना सामुदायिक निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यास प्रवृत्त करतात. महिला सक्षमीकरण हा शब्द समान अधिकार असलेल्या स्त्रियांना बहाल केला तर असे लक्षात येते की ग्रामीण महिलांचा विकास करण्यासाठी महिला बचत गटाची स्थापना करण्यात आलेली आहे. 1989 मध्ये सुरू झालेल्या SHGs हे सहसा 8-10 महिलांचे गट होते जे आठवड्यातून एकदा त्यांच्या सदस्यांकडून पैसे गोळा करण्यासाठी, त्यांना बँकांशी जोडण्यासाठी आणि कमी व्याजावर कर्ज देण्यासाठी एकत्र येतात, दुसरीकडे भारताच्या मागास भागात महिला चालवल्या जाणाऱ्या स्वयंसहायता गटांनी कोविड 19 विरुद्ध शौर्याने लढा दिल्याचे पाहायला मिळते. ग्रामीण भागात आजही मास्क सॅनिटायझर आणि संरक्षणात्मक उपकरणे यासारख्या महत्त्वपूर्ण वैद्यकीय वस्तूंची निर्मिती स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून केली जात आहे. यातून वंचित समुदायांना मदत होते. बचत गटाच्या माध्यमातून मायक्रो फूड प्रोसेसिंग एंटरप्राईजेस आणि शेतकरी उत्पादक संस्थांना केंद्र सरकारकडून आर्थिक मदत देखील मिळत आहे.

ग्रामीण भागात आज महिलांचे सक्षमीकरण मध्ये नेतृत्व कौशल्य निर्माण करणे, शाळेतील नाव नोंदणीला चालना देणे आणि पोषण आणि गर्भनिरोधक वापरात सुधारणा करणे यासारखी उद्दिष्टे आज महिला बचत गटाकडे आहेत. ग्रामीण भागातील लोकांना वित्त उपलब्ध करून देण्यात बचत गट महत्वपूर्ण भूमिका बजावताना दिसत आहेत. आज यामध्ये सर्वाधिक महिलांचे प्रमाण पाहावयास मिळते. ग्रामीण भागातील जवळपास 90% महिला आज बचत गटाच्या माध्यमातून जोडल्या गेलेल्या आहेत आणि त्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत करताना दिसत आहेत.

**आव्हाने**

- **शैक्षणिक मागासलेपणा** : ग्रामीण भागातील महिलांचे साक्षरतेचे प्रमाण शहरी भागापेक्षा कमी आहे, ज्यामुळे त्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि शिक्षणाच्या संधींपासून वंचित राहावे लागते.
- **आर्थिक स्वायत्ततेचा अभाव**: अनेक वेळा महिलांच्या नावावर जमिनी किंवा मालमत्ता नसल्यामुळे त्या आर्थिक निर्णयांमध्ये मागे राहतात.
- **आरोग्य आणि पोषण समस्यां:** कमी पोषण, आरोग्य सुविधांचा अभाव, आणि कुपोषण या समस्या महिलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम करतात.
- **लैंगिक भेदभाव:** ग्रामीण भागात अजूनही पारंपरिक पद्धतींमुळे महिलांना दुय्यम स्थान दिले जाते. त्यामुळे त्यांच्या कौशल्याला आणि श्रमाला योग्य तो दर्जा मिळत नाही.
- **तांत्रिक शिक्षणाचा अभाव:** आधुनिक तंत्रज्ञान व डिजिटल साधनांमध्ये महिलांची समावेशिता कमी आहे, ज्यामुळे त्यांची उत्पादकता मर्यादित राहते.
- **महिलांवरील हिंसा आणि सुरक्षिततेचे प्रश्न:** सार्वजनिक आणि खासगी दोन्ही ठिकाणी महिलांना हिंसेचा सामना करावा लागतो, ज्यामुळे त्यांची कामगिरी व आत्मविश्वास कमी होतो.

**उपाय आणि उपाययोजना**

- **शिक्षण व प्रशिक्षण**: महिलांसाठी मोफत व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे. कृषी, हस्तकला, आणि तंत्रज्ञान क्षेत्रात महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे.
- **आर्थिक स्वायत्ततेसाठी मदत**: महिलांच्या नावावर मालमत्ता नोंदणीला प्रोत्साहन देणे. महिला उद्योजकांसाठी सुलभ कर्ज योजना आणि अनुदाने उपलब्ध करून देणे.
- **आरोग्य सेवा सुधारणे**: महिलांसाठी आरोग्य सेवा, पोषण कार्यक्रम, आणि मातृत्व काळजीसाठी विशेष योजना राबवणे.
- **समान संधी आणि अधिकार**: महिलांना समान वेतन, निर्णयप्रक्रियेत सहभाग, आणि सुरक्षित कामाची जागा देण्यासाठी कठोर कायद्यांची अंमलबजावणी करणे.
- **डिजिटल सक्षमता वाढवणे**: ग्रामीण महिलांना डिजिटल उपकरणे आणि इंटरनेटचा वापर करण्याचे प्रशिक्षण देणे.

**निष्कर्ष :**

ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महिलांचा सहभाग आणि योगदान अमूल्य आहे, परंतु त्यांच्या समोर अनेक आव्हाने आहेत. महिलांच्या आर्थिक, सामाजिक, आणि सांस्कृतिक सक्षमीकरणासाठी ठोस पावले

उचलल्यास ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक प्रगती करू शकते आणि महिलांना योग्य तो सन्मान व संधी मिळू शकते.

**संदर्भ :**

1. डॉ. विलास आढाव, 'महिला सबलीकरण, प्रौढ, निरतंर षिक्षण व ज्ञानविस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठ, पुणे.
2. डॉ. संभाजी वारंगुळे पाटील, 'महिला सबलीकरणात षासनाची भूमिका,' गोल्डन रिसर्च थॉट, मार्च 2014.
3. भारत सरकार, '2011 चा जनगणना अहवाल, नवी दिल्ली 2011.
4. गीता लुथ्रा, 'महिला सबलीकरण कायद्यातील तरतुदी, योजना, ऑक्टोबर 2018.
5. https://agrowon.esakal.com/agro-special/there-are-many-ways-for-rural-women-to-earn-money
6. https://agrowon.esakal.com/agro-special/women-have-the-power-to-change-the-agriculture-rural-development